दैनिक
# महा मेट्रो

www.mahametronews.in

वर्ष ४ थे : अंक : १३ पुणे, पुणे, मंगळवार, २ सप्टेंबर २०२५
पाने : ४ किंमत : ३.००
RNI NO.MAHMAR2022/87390
VOL NO.04. ISSUE : 13 Pune, Tuesday, 2 September 2025
Pages : 4 PRICE : 3.00

# पूरंदर विमानतळाशिवाय पर्याय नाही : शरद पवार

## प्रकल्प पूर्ण झाल्यास केवळ पुण्याचा नव्हे, तर संपूर्ण विभागाचा चेहरामोहरा बदलणार

**पुणे । प्रतिनिधी**

पूरंदर विमानतळाशिवाय आपल्याकडे पर्यायच नाही. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास केवळ पुण्याचा नव्हे, तर संपूर्ण विभागाचा चेहरामोहरा बदलणार आहे. औद्योगिक विकासाला चालना मिळेल, नवीन संस्था व उद्योगधंदे उभे राहतील, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) अध्यक्ष शरद पवार यांनी रविवारी स्पष्ट केले.

उरुळी कांचन ग्रामपंचायत इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी पत्रकारांशी संवाद साधताना पवार यांनी पुरंदर विमानतळ प्रकल्पाला पाठिंबा दर्शविला. त्यांनी सांगितले की, या विमानतळाचा फायदा पुण्यासोबतच अहमदनगर, सोलापूर, सातारा जिल्ह्यांनाही होणार आहे. आंतरराष्ट्रीय उड्डाणांसाठी या भागातील लोकांना आता मोठ्या शहरांचा आधार घ्यावा लागतो. पुरंदर विमानतळामुळे ही गरज संपेल, असे ते म्हणाले.



**पनवेल विमानतळाशी तुलना**

पवार यांनी पुरंदर प्रकल्पाची तुलना नवी मुंबईतील पनवेल येथे होत असलेल्या विमानतळाशी केली. पनवेल विमानतळ सुरू झाल्यानंतर तेथील विकासकामे ज्या पद्धतीने वेगाने पुढे जात आहेत, त्याच धर्तीवर पुरंदर विमानतळामुळे पुणे व परिसरातील विकासाला वेग येईल, असे त्यांनी नमूद केले.




**प्रकल्पाशिवाय पर्याय नाही, पण जमीन आवश्यक**

पवार म्हणाले, या प्रकल्पाचे अनेक फायदे आहेत. याशिवाय दुसरा पर्याय नाही. मात्र दुर्दैवाने, जर प्रत्यक्षात आणायचे असेल तर जमीन आवश्यक आहे.

**शेतकऱ्यांचा विरोध शिथिल**

पुरंदर विमानतळासाठी भूसंपादनाला विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांशी नुकतीच बैठक झाल्याचेही त्यांनी सांगितले. जिल्हा प्रशासनाचे अधिकारी उपस्थित असलेल्या या बैठकीत शेतकऱ्यांना त्यांचे हित जपले जाईल, अशी ग्वाही दिली गेली. या बैठकीनंतर शेतकऱ्यांचा विरोध पूर्णपणे संपला आहे असे मी म्हणणार नाही; परंतु तो निश्चितच कमी झाला आहे, असे पवारांनी स्पष्ट केले.

**भूतकाळातील उदाहरणांचा दाखला**

पवार यांनी धरणे, चाकण व रांजणगाव एमआयडीसी, हिंजवडी आयटी पार्क अशा प्रकल्पांचा उल्लेख करत सांगितले की, या सर्वांसाठी शेतकऱ्यांनी जमीन दिली होती. त्या प्रकल्पांमुळे शेतकऱ्यांचे जीवन बदलले. धरणांमुळे शेतकऱ्यांना विविध पिके घेता आली. जुन्नर भागात केळीची लागवड सुरू झाली आणि ती आता परदेशातही निर्यात होते, असे त्यांनी सांगितले.

**अजित पवार अनुपस्थित**

या कार्यक्रमात व्यासपीठावर अजित पवार उपस्थित राहणार होते; परंतु त्यांनी मुंबईत परत जाऊन मराठा आरक्षण आंदोलनाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक घेतल्याने सर्व कार्यक्रम रद्द केले.

**सरकारचा निर्णय व शेतकऱ्यांचा ठाम विरोध**

ऑगस्टच्या सुरुवातीला राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या तीव्र विरोधामुळे अधिग्रहणाची व्याप्ती २,३८२ हेक्टरवरून कमी

पान ३ वर...

**बाधित होणारी गावे**

**या प्रकल्पामुळे पारगाव मेमाणे, एखतपूर, कुंभारवळण, वनपुरी, खानवडी, मुंजवडी आणि उदाचीवाडी या गावांतील लोकांना जमीन द्यावी लागणार आहे. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक शेतकरी आंदोलन करीत आहेत.**

## महत्वाचे...

### कोंढवा येथे घरफोडी; रोकड व सोन्याचे दागिने लंपास

**पुणे । प्रतिनिधी**

येवलेवाडी रोडवरील आनंद सोसायटीतील एका फ्लॅटमध्ये दुपारी घरफोडीची घटना घडली. फ्लॅट बंद असताना अज्ञात चोरट्याने मुख्य दरवाजाचे कुलूप उचकटून घरात प्रवेश केला. बेडरूममधील कपाटातून ७ हजार रुपये रोख आणि सोन्याचे दागिने असा एकूण १ लाख ६२ हजार २६४ रुपयांचा ऐवज चोरीस नेला. या प्रकरणी कोंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहायक पोलीस निरीक्षक सुकेशिनी जाधव तपास करीत आहेत.

### सिंहगड रोडवर कामगाराचा १४ व्या मजल्यावरून पडून मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

सिंहगड रोडवरील विठ्ठलवाडी परिसरात सुरू असलेल्या इमारतीच्या पेंटिंगच्या कामादरम्यान झालेल्या अपघातात एका ३४ वर्षीय कामगाराचा मृत्यू झाला. सुमा स्कायडेल इमारतीच्या १४ व्या मजल्यावर काम सुरू असताना सुरक्षा साधनांची व्यवस्था न केल्याने कामगाराचा तोल जाऊन तो खाली पडला. गंभीर दुखापतीमुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी पेंटिंग ठेकेदाराविरुद्ध सिंहगड रोड पोलीस ठाण्यात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक आर. आर. अडागळे तपास करीत आहेत.

### दुचाकीस्वाराने मोबाईल हिसकावला

**पुणे । प्रतिनिधी**

स्वारगेट येथील लक्ष्मीनारायण चौकात शनिवारी सकाळी दुचाकीस्वाराने मोबाईल चोरीची घटना घडली. कर्मवीर भाऊराव पुतळ्याजवळ उभ्या असलेल्या व्यक्तीकडील २५ हजार रुपये किमतीचा मोबाईल अज्ञात इसमाने दुचाकीवरून येत हातातून हिसकावून नेला. या प्रकरणी स्वारगेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### धनकवडीत ४० हजारांचा मोबाईल हिसकावला

**पुणे । प्रतिनिधी**

धनकवडी परिसरात शनिवारी रात्री मोबाईल चोरीची घटना घडली. शंकर महाराज उड्डाणपुलाजवळ ब्लिंकीट शॉपच्या बाजूला उभ्या असलेल्या व्यक्तीकडून अज्ञात दुचाकीस्वाराने ४० हजार रुपये किमतीचा मोबाईल हिसकावून नेला. या प्रकरणी सहकारनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, पोलीस उपनिरीक्षक अमोल पवार तपास करीत आहेत.

### ऑनलाईन ट्रेडिंगच्या आमिषाने ३.२७ लाखांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

ऑनलाईन ट्रेडिंग व हॉटेल रेटिंगवर नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून धायरी परिसरातील एका व्यक्तीची तब्बल ३ लाख २७ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. मोबाईल व विविध बँक खात्यांच्या माध्यमातून आरोपींनी विश्वास संपादन करून पैसे हस्तांतरित करून घेतले. या प्रकरणी नांदेडसिटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल भोस तपास करीत आहेत.

# शहरातील मेट्रो विस्तारीकरणाच्या सविस्तर प्रकल्प अहवालाचे सादरीकरण

**पिंपरी । प्रतिनिधी**


पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील प्रस्तावित मेट्रो विस्तारीकरणासाठी शहरातील लोकप्रतिनिधी व पुणे महा मेट्रोच्या अधिकाऱ्यासमवेत फुगेवाडी येथील मेट्रो कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत भक्ती शक्ती चौक – मुकाई चौक, किवळे – भुजबळ चौक, वाकड साई चौक, जगताप डेअरी – कोकणे चौक, नाशिक फाटा – संत तुकाराम नगर चौक, गवळी माथा चौक, भोसरी डिस्ट्रीक सेंटर, गोडाऊन चौक – चाकण या महत्त्वाच्या मार्गांच्या प्रकल्प अहवालावर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस विधासभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, खासदार श्रीरंग अप्पा बारणे, विधान परिषद सदस्य उमा खापरे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, एन एच आय चे प्रकल्प संचालक संजय कदम, महा मेट्रो संचालक अतुल गाडगीळ, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता बापू गायकवाड, सुनील पवार, माजी महापौर डॉ. वैशाली घोडेकर, माजी स्थायी समिती सभापती सीमा सावळे, माजी नगर सदस्य राहुल कलाटे, शत्रुघ्न काटे, सचिन चिखले यांच्यासह महा मेट्रोचे अधिकारी वर्ग उपस्थित होता.

पिंपरी चिंचवड शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. पुणे (महामेट्रो) यांच्यामार्फत मेट्रो विस्तारीकरणाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (ृझठ) तयार करण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विनंतीनुसार सदर प्रकल्प अहवाल महामेट्रोने महानगरपालिकेस सादर केला

पान ३ वर...





# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पादचारी पूलाचे उद्घाटन

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे मेट्रोच्या पहिल्या टप्प्यातील वनाझ ते रामवाडी मार्गावर छत्रपती संभाजी उद्यान मेट्रो स्थानक ते शनिवार पेठ यांना जोडणारा मुठा नदीवर बांधण्यात आलेल्या पादचारी पूलाचे आज दिनांक १ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन झाले. हा पूल छत्रपती संभाजी उद्यान मेट्रो स्थानकाला शनिवार पेठ, सदाशिव पेठ आणि नारायण पेठ यांसारख्या दाट लोकवस्तीच्या भागांशी जोडतो, ज्यामुळे परिसरातील नागरिकांना मेट्रो सेवा वापरणे अधिक सोयीचे होईल. हा पूल एक आधुनिक

पान ३ वर...



# मुख्यमंत्री पुणे दौऱ्यावर; मराठा आंदोलकांना घेतले ताब्यात

**पुणे । प्रतिनिधी**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठी राज्यात गेल्या काही महिन्यांपासून तीव्र चळवळ सुरू आहे. मुंबईतील आझाद मैदानावर मनोज जरांगे पाटील गेल्या चार दिवसांपासून ठिय्या आंदोलन करत असून, त्याला राज्याच्या कानाकोपऱ्यातून मोठा प्रतिसाद मिळतो आहे. हजारो मराठा समाजातील कार्यकर्ते, शेतकरी आणि तरुण वर्ग आझाद मैदानावर दाखल होत आहेत. तरीदेखील राज्य सरकारकडून अद्याप ठोस निर्णय न घेण्यात आल्याने आंदोलकांमध्ये असंतोष वाढला असून, त्याची छाया आता पुण्यातही उमटू लागली आहे.




दरम्यान, गणेशोत्सवाच्या उत्साहमय वातावरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सोमवारी पुणे दौऱ्यावर आले. त्यांनी खडकवासला येथील सिनेअभिनेते नाना पाटेकर यांच्या निवासस्थानी जाऊन गणेश दर्शन घेतले. त्यानंतर सिंहगड रोडवरील नव्या पुलाच्या उदघाटनासाठी ते रवाना झाले. मुख्यमंत्रींच्या या दौऱ्याला मोठा राजकीय आणि सामाजिक संदर्भ लाभला होता. कारण, मराठा आरक्षणाचा मुद्दा तीव्रतेने पेट घेत असतानाच फडणवीस पुण्यात दाखल झाले होते.

मुख्यमंत्री पुण्यात येणार असल्याची माहिती मिळताच, मराठा समाजातील काही आंदोलनकर्त्यांनी पुलाच्या उदघाटनस्थळी जाऊन आरक्षणाबाबत निवेदन द्यायचे ठरवले. आंदोलकांची भूमिका होती की, मुख्यमंत्रींच्या प्रत्यक्ष भेटीतून त्यांची व्यथा सरकारच्या कानावर पुन्हा ठसवावी. मात्र, मुख्यमंत्रींच्या सुरक्षेच्या दृष्टीने पुणे पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. आंदोलक उदघाटनस्थळी पोहोचताच पोलिसांनी त्यांना रोखले आणि काहींना ताब्यात घेतले.

या कारवाईनंतर आंदोलकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. ''आम्ही निवेदन देण्यासाठी आलो होतो. आमचा आवाज पोहोचवण्याची संधीही सरकार देत नाही,'' अशी प्रतिक्रिया काही आंदोलनकर्त्यांनी दिली. दुसरीकडे, पोलिसांकडून असे सांगण्यात आले की, मुख्यमंत्रींच्या सुरक्षेसाठी ही कारवाई अपरिहार्य होती. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात उत्साहाचे वातावरण असले तरी मराठा आरक्षणाचा मुद्दा सुटलेला नसल्याने राजकीय वातावरण मात्र ढवळून निघाले आहे. मुख्यमंत्रींच्या दौऱ्यामुळे पुण्यातील या घडामोडींनी पुन्हा एकदा सरकारसमोर मराठा समाजाच्या असंतोषाचा प्रश्न ठामपणे उभा केला आहे.

पान ३ वर...

# देशभरातून अनेक दलित नवउद्योजक निर्माण होणार : पद्मश्री मिलिंद कांबळे

**पुणे । प्रतिनिधी**

दलित उद्योजकांना भारत सरकारच्या अलिमको या संस्थेच्या माध्यमातून नव्या संधी निर्माण होणार असल्याचे दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री चे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मिलिंद कांबळे यांनी आज जाहीर केले. दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (डिक्की) आणि आर्टिफिशियल लिम्ब्स मॅन्युफॅक्चरिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (अलिमको) यांच्या वतीने पुण्यात वेंडर डेव्हलपमेंट कार्यक्रम आयोजित केला होता. त्यावेळी ते बोलत होते.

अलिमको ही भारत सरकारच्या सामाजिक न्याय विभागाची दिव्यांगाना लागणाऱ्या विविध वस्तू व उपकरणे बनवाबनवी अग्रेसर संस्था आहे. विविधसार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम) यांच्या संयुक्त विद्यमाने एक पुण्यात यशस्वीपणे



पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन डिक्की चे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री डॉ. मिलिंद कांबळे यांच्या हस्ते झाले. उद्घाटन सत्रामध्ये अलिमको चे उपमहाव्यवस्थापक आलोक कुमार ठाकुर तसेच वरिष्ठ व्यवस्थापक चंद्र किशोर हे मान्यवर अतिथी म्हणून उपस्थित होते. स्वागतपर भाषण डिक्की चे अविनाश जगताप यांनी केले. यानंतर अलिमको चे उपमहाव्यवस्थापक आलोक कुमार ठाकुर तर्फे सविस्तर सादरीकरण करण्यात आले. या सादरीकरणात अलिमको

पान ३ वर...